# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## १५ ऑक्टोबरपासून २,००० रुपयांवरील यूपीआय व्यवहारांवर मर्चंट शुल्क

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने मंगळवारी जाहीर केले की, १५ ऑक्टोबरपासून व्यापाऱ्यांना यूपीआय द्वारे २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेचे पेमेंट स्वीकारताना ०.४ टक्के शुल्क भरावे लागेल. 'मर्चंट डिस्काउंट रेट' असे संबोधले जाणारे हे शुल्क प्रति व्यवहार जास्तीत जास्त ३०० रुपयांपर्यंत मर्यादित असेल. याचाच अर्थ असा की, जर एखाद्या व्यापाऱ्याला यूपीआय द्वारे ७५,००० रुपये किंवा त्याहून अधिक रकमेचे पेमेंट केले गेले, तरीही एमडीआर शुल्क ३०० रुपयांपेक्षा जास्त असणार नाही. दरम्यान, रेल्वे, दूरसंचार सेवा, विमा आणि इंधन यांसारख्या विशिष्ट श्रेणींमधील व्यापाऱ्यांना केलेल्या २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर, प्रति व्यवहार ५ रुपये इतके निश्चित एमडीआर शुल्क आकारले जाईल. ''या निश्चित दराच्या पद्धतीमुळे महत्त्वपूर्ण सार्वजनिक सेवा, उपयुक्तता सेवांची बिले स्वीकारण्याची प्रक्रिया आणि किरकोळ इंधन विक्रीसारख्या कमी नफ्याचे प्रमाण असलेल्या क्षेत्रांमधील खर्चात होणारी वाढ रोखली जाईल. यामुळे ग्राहकांसाठीच्या अत्यावश्यक सेवा कमी खर्चात आणि डिजिटलदृष्ट्या कार्यक्षम राहणे निश्चित होईल'', असे एनपीसीआय ने एका निवेदनात म्हटले आहे. मंगळवारी जाहीर करण्यात आलेला नवा मर्चंट डिस्काउंट रेट नियम केवळ 'पर्सन-टू-मर्चंट' म्हणजेच ग्राहक आणि व्यापारी यांच्यातील व्यवहारांना लागू होईल. 'पर्सन-टू-पर्सन' म्हणजेच दोन व्यक्तींमधील कोणत्याही रकमेचा व्यवहार यापुढेही मोफत राहतील.


(वर्ष ६५ वे अंक २३२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.१६ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# मनोज जरांगेंची मुंबईकडे कूच

जालना दि.१५ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या दिशेने कूच केली आहे. अंतरवाली सराटी येथील उपोषणाची जागा सोडून मनोज जरांगे पाटील मुंबईकडे रवाना झाले आहेत. मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, अंतरवाली सराटी येथून निघताना मनोज जरांगे पाटील भावूक झाले. गाडीत बसताच त्यांना अश्रू अनावर झाले. यावेळी एबीपी माझाशी बोलताना त्यांनी समाजाच्या लेकरांसाठी लढत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. सरकारला शरण जाणार नसून, मराठा आरक्षणाच्या मागणीची अंमलबजावणी झाल्याशिवाय थांबणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.



अंतरवालीतून निघताना गाडीत बसताच त्यांना अश्रू अनावर झाल्याने ते प्रचंड भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी एबीपी माझाशी संवाद साधताना त्यांनी आपली ठाम भूमिका स्पष्ट केली असून, समाजाच्या लेकरांच्या भवितव्यासाठी आपला हा लढा अविरत सुरूच राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच, कोणत्याही परिस्थितीत सरकारला शरण न जाता मराठा आरक्षणाची पूर्ण अंमलबजावणी होईपर्यंत आपण माघार घेणार नाही, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मनोज जरांगे पाटील एबीपी माझाशी बोलताना म्हणाले की, ''समाजाच्या लेकरांपेक्षा मला मोठे काय आहे. माझ्या समाजाचे लेकरं संकटात आहेत त्यांच्या कल्याणासाठी मी जातोय. सरकारला वाटतंय मी त्यांना शरण यावे पण समाजाच्या लेकराला अर्धवट सोडून मी समाजाला धोका देऊ शकत नाही. मला ते मारून टाकणार आहेत म्हणून मी आझाद मैदानावर जात आहे. मी माझ्या समाजाला त्रास होऊ देणार नाही मी लढून मरेल,'' असे त्यांनी म्हटले. मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, ''न्यायदेवतेवर आपण विश्वास ठेवायचा आणि तीच परवानगी समजायची. माझं सगळ्यांना आवाहन आहे की, शांत राहा. तुमच्या लेकरांसाठी मी लढेन. सरकारने मला चौकोनी घेरलं आहे. तुम्ही माझ्यासोबत राहा. मी जिवंत असो की नसो तुम्ही समाज मोठा करा. पक्षाला जीव लावू नका, समाजाला जीव लावा. मी मुंबईला जातोय. तुम्ही आशीर्वाद द्यायला या. मला मारायचं तर मारू द्या. मी आरक्षण घेतल्याशिवाय राहणार नाही. पायात आणि पोटात आग होते,'' असे त्यांनी म्हटले.

### मनोज जरांगेंना मुंबईत आंदोलनाची परवानगी नाहीच, मुंबई पोलिस भूमिकेवर ठाम

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- सलग दोन वेळा परवानगी नाकारूनही मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील मुंबईला जाण्याच्या भूमिकेवर ठाम आहेत. दोन दिवसांपासून पाणी आणि उपचार सोडल्याने जरांगेंची तब्येत अत्यंत खालावलेली असतानाही, ते आज आंतरवाली सराटीतून मुंबईकडे रवाना झाले आहेत. मात्र गणपती उत्सवामुळे मुंबईत येण्याची परवानगी नाकारण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे यापूर्वी दोन वेळा मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला परवानगी नाकारली होती. आता पुन्हा एकदा गणेशोत्सवाच्या कारणास्तव मुंबई पोलिसांनी पुन्हा एकदा परवानगी नाकारली आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांचा ताफा मुंबईच्या वेशीवरच अडवला जाण्याची शक्यता आहे.

सध्या राज्यभर गणेशोत्सवाचा उत्साह असून मुंबईत मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते. मुंबईतील मनाचे गणपती तसेच सार्वजनिक गणपती बाप्पांचे दर्शन घेण्यासाठी भाविक आले आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभवू नये म्हणून मुंबई पोलिसांनी त्यांच्या आंदोलनाला परवानगी नाकारली आहे. तसेच जमावबंदीच्या आदेशानुसार जर कोणाला आंदोलन करायचे असेल तर रीतसर पोलिसांची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

## जरांगेंनी आंदोलनाचा हट्ट सोडावा; मुख्यमंत्री फडणवीसांचे आवाहन

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या १३ पैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्या असून, चालू गणेशोत्सवात जनतेला त्रास होऊ नये म्हणून मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबई आंदोलनाचा हट्ट सोडावा, असे स्पष्ट आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. न्यायालयाच्या कचाट्यात अडकणाऱ्या मागण्यांमुळे समाजाचेच नुकसान होईल, ही वस्तुस्थिती समजून घेत जरांगेंनी सणासुदीच्या काळात समजूतदारपणा दाखवावा, असेही फडणवीसांनी नमूद केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील नागरिकांची आणि भाविकांची गैरसोय होऊ नये. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी जरांगे पाटील यांनी मुंबईत येण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, असे आवाहन केले आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आक्रमक झालेल्या जरांगे यांचा ताफा आंदोलनाच्या इराद्याने मुंबईच्या दिशेने निघाला आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या चर्चेनंतर जरांगे यांना मुंबईत न येण्याचे आवाहन करण्याबाबत एकमत झाले. त्याविषयीची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी जरांगे यांना सणासुदीच्या काळात कोणाला त्रास होऊ नये म्हणून सध्या आंदोलन न करण्याचे आवाहन केले. कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबबदारी असते. पोलिसांनी जरांगे पाटील यांचा आधीचा अर्ज नाकारला आहे. तरी त्यांनी पुन्हा एकदा अर्ज दिला असून त्यावर पोलीस निर्णय घेतील. आमची अपेक्षा इतकीच आहे की मुंबई आणि पुणे या दोन्ही ठिकाणी गणेशोत्सव प्रचंड मोठया प्रमाणात साजरा होतो. हिंदूंच्या सणांतील मोठा सण म्हणून सार्वजनिकरित्या साजरा केला जातो. त्यांनी याआधीही आंदोलने केली तसे ते पुढेही करू शकतात, असेही फडणवीस म्हणाले.

सीईटी संदर्भात एसआयटी आजच स्थापन केली आहे. सीईटीबाबत जेवढ्या तक्रारी असतील त्याची चौकशी एसआयटी मार्फत केली जाणार आहे . फॉरेन्सिक ऑडिटही केले जाईल. कुठेही गडबड निघाली तर फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा फडणवीस यांनी यावेळी दिला.

गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील नागरिकांची आणि भाविकांची गैरसोय होऊ नये आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी जरांगे पाटील यांनी मुंबईत येण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. समाजाची सोडून राजकीय भूमिका घेऊ नका आणि आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याचे आवाहन शिंदे यांनी केले आहे.

२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर सरकारने विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले. ५,३०० प्रलंबित नियुक्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यात आला. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कर्जमर्यादेत वाढ करून ती १० लाखांवरून १५ लाख रुपये करण्यात आली. कुणबी नोंदी असलेल्या व्यक्तींना न्याय देण्यासाठी शिंदे समितीच्या माध्यमातून प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले.

मराठा समाजाला न्याय देताना अन्य कोणत्याही समाजावर, विशेषतः ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, ही सरकारची भूमिका असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. सरकार प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेत असेल, तर आंदोलनकर्त्यांनीही सहकार्याची भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

## पुढील १५ दिवस पाऊस मारणार दडी, नागपूर वेधशाळेनं शेतकऱ्यांना दिला पावसाची वाट न पाहण्याचा सल्ला

नागपूर दि.१५ (प्रतिनिधी)- राज्यभरात बळीराजा पावसाच्या प्रतिक्षेत आहे, अशातच शेतकऱ्यांची चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे, पुढची १५ दिवस विदर्भात मान्सूनच्या पावसाची कुठली शक्यता नसल्याने शेतकऱ्यांनी मान्सूनच्या पावसाची वाट न पाहता सिंचनाच्या पर्यायी उपयोजनेवर लक्ष केंद्रित करावे असा सल्ला नागपूर वेध शाळेने दिला आहे. बांगालच्या उपसनगरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला की विदर्भाला मान्सूनचा पाऊस मिळतो. मात्र सध्या पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची कुठली शक्यता दिसत नसल्याची माहिती नागपूर वेध शाळेचे वैज्ञानीक प्रवीण कुमार यांनी दिली. सध्या अल निनोचा प्रभाव कायम असून सप्टेंबर महिन्यात देखील सरासरी पेक्षा कमी पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे. स्थानिक वातावरणीय परिस्थितीमुळे छोट्या छोट्या भागात पाऊस पडेल पण मान्सूनच्या सक्रिय पावसाची सध्या दोन आठवडे शक्यता नसल्याने प्रवीण कुमार यांनी सांगितले.

वैज्ञानिक, प्रवीण कुमार यांनी माहिती देताना सांगितलं की, पुढच्या काही दिवसांमध्ये पावसाची खूप कमी शक्यता आहे. कारण पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची कुठली शक्यता दिसत नसल्याची माहिती आहे, पुढील ४ ते पाच दिवस पावसाची खूप कमी शक्यता आहे, सर्वत्र पावसाची कुठेही शक्यता दिसत नाहीये, पुढचे १५ दिवस पावसाची शक्यता नसल्याने आता शेतकऱ्यांनी पर्यायी मार्गांचा वापर केला पाहिजे. अल निनोचा प्रभाव दिसून येत आहे, अल निनोचा मोठ्या प्रमाणावर सक्रिय झालेला आहे.

## पाच ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे पंचनामे, टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची तयारी सुरु; मुख्यमंत्र्यांची माहिती

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- राज्यात मोसमी पावसाच्या खंडामुळे खरीप हंगाम धोक्यात आल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे तातडीने पंचनामे सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. अधिकृत पंचनामे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणार असले तरीही टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी होईल.

राज्यात मोसमी पावसाने ऑगस्ट सप्टेंबर महिन्यात ओढ दिल्यामुळे राज्यभरातील खरीप हंगाम अडचणीत आला असून, लोकप्रतिनिधींकडून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्यावर मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत सविस्तर चर्चा झाली. चर्चे अंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय आपत्ती निधीच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार दुष्काळी स्थितीचे पंचनामे पाच ऑक्टोबरपासून सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

ग्रामीण भागातील सर्वच मंत्र्यांनी पावसाअभावी खरीप हंगामाची स्थिती अत्यंत नाजूक आहे. महिनाभरापासून पावसाने दडी मारल्यामुळे पिके करपली आहेत. कमी दिवसांत येणारी मूग, मटकी, चवळी सारखी कडधान्य पिके वाया गेली आहेत. सिंचनाची सोय नसलेल्या ठिकाणी पिकांची काढणी करून काही हाती लागेल, अशी स्थिती नाही. ऊस पिकाची वाढ खुंटली आहे. उसाच्या नव्या लागणी पाण्याअभावी अडचणीत आल्या आहेत.

लोकप्रतिनिधींकडून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने पाऊले उचलण्याची गरज आहे, अशी एकमुखी आग्रही मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली.

यंदाच्या मोसमी पावसाच्या हंगामात जूनमध्ये पाऊस सक्रीय झाला नव्हता. जुलैमध्ये चांगला पाऊस पडल्यामुळे पेरण्यांनी सरासरी गाठली. धरणे भरली.

पण, ऑगस्टपासून सप्टेंबरमध्यापर्यंत पावसाने मोठी ओढ दिली आहे. एकूण २० जिल्ह्यांतील ८६ तालुक्यांत ३० दिवसांपर्यंत पावसाचा खंड पडला आहे. उत्तर महाराष्ट्रात ३१, पश्चिम महाराष्ट्रात १७, मराठवाड्यात १६, विदर्भात २२, असा एकूण ८६ तालुक्यांत पावसाचा खंड पडला आहे. आहिल्यानगरमधील कर्जत आणि पुण्यातील शिरूरमध्ये ४३ दिवसांहून जास्त खंड पडला आहे, तर खामगाव (बुलढाणा), संगमनेर (आहिल्यानगर), परांडा (धाराशिव), देवळाली, कळवण (नाशिक), इंदापूर (पुणे), फलटण (सातारा) आणि माळशिरस (सोलापूर) येथे ४० दिवस खंड पडला आहे. ३० दिवसांहून जास्त खंड पडलेले तालुके २७ असून, २५ ते ३० दिवस खंड पडलेले तालुके २६ आहेत.

## मनोज जरांगेंचे उपोषण नेमके कोणासाठी?; अजय बारस्कर यांचा सवाल

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, गेल्या १८ दिवसांपासून उपोषणाला बसलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आज मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. या सर्व घडामोडींवर अजय बारस्कर यांनी आपली परखड प्रतिक्रिया देत काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. मनोज जरांगे यांचे हे उपोषण खरोखरच मराठा आरक्षणासाठी आहे, की केवळ चौघांचे दाखले मिळवून देण्यासाठी आणि चौकशा थांबवण्यासाठी? असा सवाल त्यांनी विचारला आहे. तसेच, महाराष्ट्रातील मराठा समाजाने त्यांना हे उपोषण करायला लावलेले नाही. त्यामुळे जरांगे यांच्या जीवाला काही धोका निर्माण झाल्यास त्याला दहीहंडे, पारवे, पांडुरंग तारक आणि गंगाधर काळकुटे हेच लोक सर्वस्वी जबाबदार असतील, असा थेट आरोप करत या सर्वांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी बारस्कर यांनी केली आहे.

अजय बारस्कर म्हणाले, मनोज जरांगे यांचे उपोषण खरोखरच मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी असेल, तर त्यांच्या स्वतःच्या सहीचे मागण्यांचे सविस्तर निवेदन कुठे आहे? त्या निवेदनात नेमक्या कोणत्या मागण्या आहेत आणि त्या सरकारकडे अधिकृतपणे कधी सादर करण्यात आल्या, हे समाजासमोर जाहीर करावे, अशी मागणी अजय बारस्कर यांनी केली.

## मनोज जरांगे यांना रुग्णालयात दाखल होण्याचा व प्रवास टाळण्याचा जिल्हा आरोग्य यंत्रणेचा सल्ला

जालना दि.१५ (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची आज सकाळी साडेअकराच्या सुमारास जिल्हा वैद्यकीय यंत्रणेकडून तपासणी करण्यात आली. उपोषणामुळे प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा तसेच प्रवास टाळण्याचा सल्ला वैद्यकीय पथकाने दिला होता. मात्र श्री. जरांगे पाटील यांनी रुग्णालयात दाखल होण्यास संमती दिली नाही, अशी माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली.

श्री. जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट २०२६ पासून अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसले होते. त्यांच्या प्रकृतीच्या निगराणीसाठी चोवीस तास तज्ज्ञ डॉक्टरांचे वैद्यकीय पथक कार्यरत होते. त्यांच्या प्रकृतीची जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाकडून नियमित तपासणी करण्यात येत होती. दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.१० वाजता केलेल्या तपासणीमध्ये श्री. जरांगे पाटील शुद्धीत व प्रतिसाद देण्याच्या स्थितीत होते. तथापि, त्यांना थकवा जाणवत होता व जीभ कोरडी असल्याचे आढळून आले. त्यांनी लघवीचा नमुना दिलेला नाही. तसेच शिरेद्वारे द्रवपदार्थ घेण्यास नकार दिला, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी अहवालाद्वारे दिली.

यापूर्वी दि. १४ सप्टेंबर रोजी रात्री ९.४० वाजता केलेल्या तपासणी करण्यात आली. तसेच दि. १५ सप्टेंबर रोजी पहाटे १.३० आणि सकाळी ७.०५ वाजता त्यांनी वैद्यकीय तपासणीस नकार दिला. श्री. जरांगे यांनी तपासणी व उपचार घ्यावे, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून वेळोवेळी विनंती करण्यात आली. तसेच त्यांच्याशी वारंवार संवाद साधून तपासणी व उपचार करून घेण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करण्यात आले. मात्र, त्यांनी उपचार घेण्यास व रुग्णालयात दाखल होण्यास नकार दिला.

सध्याची प्रकृती पाहता प्रवास करणे योग्य नसल्याचा सल्लाही श्री. जरांगे यांना देण्यात आला आहे. त्यांना प्रकृतीच्या संभाव्य धोक्यांची माहिती देऊनही श्री. जरांगे पाटील यांनी रुग्णालयात दाखल होण्यास संमती दिलेली नसल्याची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली.

## उपवर्गीकरणाचा विषय पुन्हा पेटला ; मातंग समाज मुंबईत काढणार महामोर्चा

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मुंबईत आंदोलनाचे वारे वाहत असताना आता सकल मातंग समाजानेही मुंबईत धडक देण्याचा निर्णय घेत आंदोलनाची हाक दिली आहे. अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी २९ सप्टेंबर रोजी 'मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान' असा निधार महामोर्चा सकल मातंग समाज काढणार आहे. मातंग समाज आक्रमक झाल्याने उपवर्गीकरणाचा थंड बस्त्यात गेलेला विषय पुन्हा केंद्रस्थानी आला आहे.

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मंगळवारी मातंग समाजाचे आमदार व चळवळीतील कार्यकर्ते यांची बैठक पार पडली. या बैठकीत आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात आली. न्या. बदर समितीने उपवर्गीकरणाचा अहवाल शासनाला सुपूर्त केलेला आहे. यावर एक लाख सूचना व हरकती डॉ. बाबाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेला प्राप्त झाल्या आहेत. त्यावर सुनावणी घेण्यासाठी मुख्य सचिव राजेश आग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. मात्र सरकार याप्रश्नी वेळकाढूपणा करत आहे, याविषयी बैठकीत संताप व्यक्त करण्यात आला. उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी मेपासून राज्यात मातंग समाजाने दवंडी आंदोलन व जनआक्रोश असे ७१ मोर्चे काढले आहेत. मुंबईतील महामोर्चा असेल. मोर्चाला ५ लाख मातंग बांधव येतील, असे आमदार अमीत गोरखे यांनी सांगितले.

## दिशा सालियानची फाईल ओपन करणे, हा तर जरांगेंच्या आंदोलनावरून लक्ष वळवण्याचा डाव-संजय राऊत

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- दिशा सालियन प्रकरणातील एफआयआर, मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतेच महाराष्ट्राबाबत केलेले विधान, या तिन्ही मुद्द्यांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर सडकून टीका केली आहे. दिशा सालियन प्रकरणाचा तपास आणि बातम्या या पूर्णपणे मॅनेज असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

दिशा सालियान प्रकरणात संजय राऊत यांनी गंभीर आरोप केले. ते म्हणाले, ''जोपर्यंत ठोस पुरावा नाही, तोपर्यंत कुणालाही आरोपी म्हणता येणार नाही. राष्ट्रीय स्तरावर आलेल्या या सर्व बातम्या मॅनेज आहेत. १६ पानांच्या एफआयआरमधून फक्त एकच पान बाहेर कसे येते? रविवारी सह्याद्री विश्रामगृहावर दोन महान नेत्यांची बैठक झाली आणि त्यानंतर ते एकाच गाडीतून एशियाटिक लायब्ररीमध्ये गेले. या प्रवासात आणि बैठकीत जे ठरले, त्यानुसारच हा एफआयआर लिहिला गेला आणि तो कागद बाहेर आला.'' केंद्रातील सरकार अंतर्विरोधाने खिळखिळे झाल्याने जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी असा अनैतिक दबाव आणला जात असल्याचे राऊत म्हणाले.

मनोज जरांगे पाटील आज अंतरवाली सराटीतून मुंबईकडे निघणार आहेत. याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले असतानाच, दिशा सालियन प्रकरण मुद्दाम उकरून काढण्यात आले आहे. ''हा अत्यंत गंभीर मुद्दा आहे. जरांगेंचे उपोषण आणि त्यांच्या महाराष्ट्रव्यापी प्रश्नावरून लोकांचे लक्ष दूर व्हावे, म्हणूनच गणपती उत्सवाच्या काळात हा पहिला मुद्दा प्रकर्षाने चर्चेत आणण्यात आला आहे,'' असा दावा राऊत यांनी केला.

''कुणीतरी येतोय आणि महाराष्ट्राच्या धोतराच्या कासोट्याला हात घालतोय, पण राज्याचे मुख्यमंत्री उठून उभे राहून हा महाराष्ट्र मराठी भाषिक आहे असे सांगण्याची हिंमत दाखवत नाहीत. खोटे गुन्हे दाखल करायचे असतील तर करा, पण मराठी भाषेसाठी मी तुरुंगात जायलाही तयार आहे,'' असा इशाराही संजय राऊत यांनी दिला.

## लातूरचे प्रसिद्ध संस्थाचालक संजीव सोनवणे यांची स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या, शैक्षणिक क्षेत्रात खळबळ

लातूर दि.१५ (प्रतिनिधी)- प्रसिद्ध संस्थाचालक संजीव सोनवणे यांनी आपल्या राहत्या घरी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे लातूरसह शैक्षणिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

६२ वर्षीय सोनवणे यांचे कुटुंबीय परदेशात गेलेले आहे. त्यामुळे पद्मानगर भागातील निवासस्थानी ते एकटेच होते. सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास सोनवणे यांनी स्वतःवर गोळी झाडली. सोनवणे यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाही. पोलिस सर्व बाजूंनी सखोल तपास करत असून तपासाअंतीच त्यांच्या आत्महत्येमागचे कारण स्पष्ट होईल, असे सांगण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनवणे यांनी त्यांच्या परवानाधारक पिस्तुलातून गोळी झाडून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्यांनी एक चिठ्ठी



लिहून ठेवली आहे. आपल्या मृत्यूस कोणालाही जबाबदार धरू नये आणि स्वतःच्या इच्छेनुसार आपण हे पाऊल उचलत आहे. आपल्या मृत्यूचा तपासही करू नये, असेही सोनवणे यांनी चिठ्ठीत म्हटले आहे. मात्र चिठ्ठीतील मजकूर, हस्ताक्षर आणि घटनेमागील नेमके कारण याबाबत पोलिसांनी सखोल तपास सुरू केला आहे.

संजीव सोनवणे यांनी बेंगळुरू येथून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतून अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. परळी येथे संकल्प कोचिंग क्लासेसची स्थापना करून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील कारकिर्दीस सुरूवात केली. त्यानंतर सन २००० च्या आसपास त्यांनी लातूर येथे संकल्प कोचिंग क्लासेसची स्थापना केली. कोचिंग क्लासेस चालवत असतानाच त्यांनी २००५ च्या सुमारास चंद्रभानू सोनवणे महाविद्यालय सुरू केले. त्यानंतर सोलापूरमधील बार्शी आणि पुण्यातील खडकवासला येथेही शाळा-महाविद्यालय सुरू केले होते.

सोनवणे यांनी गुणवंत व प्रगतीशील विद्यार्थी घडवण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात अनेक नवनवीन व प्रयोगशील उपक्रम राबवले. महाराष्ट्रभर गाजलेल्या लातूर पॅटर्नची निर्मिती आणि विस्तार करण्यात त्यांच्या प्रयोगशीलतेचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. संजीव सोनवणे यांच्या पश्चात एख मुलगा आणि एक मुलगी असून दोघेही इंजिनिअर आहेत आणि ते परदेशात नोकरी करतात. सोनवणे यांचे वडील चंद्रभानू सोनवणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या हिंदी विभागात विभागप्रमुख होते.

## थकीत एफआरपीसाठी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन मंजूर; ऊस उत्पादकांना राज्य शासनाचा दिलासा

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (१५ सप्टेंबर २०२६) राज्य मंत्रिमंडळाची अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील शेतकरी, पायाभूत सुविधा, प्रशासकीय सुधारणा आणि साहित्य-संस्कृती यांसारख्या विविध क्षेत्रांशी संबंधित ७ मोठे आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये विशेषतः राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी आणि अडचणीत सापडलेल्या सहकारी साखर कारखान्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे.

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना शासनाकडून सॉफ्ट लोन उपलब्ध करून देण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे २०२५-२६च्या गाळप हंगामातील शेतकऱ्यांची थकीत एफआरपी देण्यासाठी कारखान्यांना आर्थिक मदत मिळेल. तसेच, आगामी २०२६-२७च्या गाळप हंगामासाठी या कारखान्यांना शासनाचे भक्कम पाठबळ मिळणार असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील मौजे हरेगाव (ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) येथील जमिनी त्यांच्या मूळ मालकांना (शेतकऱ्यांना) परत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

राज्य शासनाच्या २५ प्रमुख धोरणांचे आणि २५ प्रमुख लोककल्याणकारी योजनांचे सखोल विश्लेषण व मूल्यांकन करण्यासाठी ''महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक)'' स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. भारतीय व्यवस्थापन संस्था, मुंबई आणि योजना व धोरणविषयक संशोधन केंद्र यांच्या शिफारशीनुसार हे मूल्यांकन होईल. एका वर्षाच्या या मूल्यमापन प्रकल्पामुळे शासनाच्या निर्णय प्रक्रियेत आणि योजनांच्या अंमलबजावणीत अधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा करता येणार आहे.

वर्धा जिल्ह्यातील आर्वी नगरपरिषदेला व्यापारी संकुल उभारण्यासाठी राज्य शासनाची ६ हजार २४०.३० चौरस मीटर जमीन विनामूल्य देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यामुळे स्थानिक पातळीवर व्यापार आणि रोजगाराला चालना मिळेल.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक शाखेला अभ्यासिका आणि वाचनालयाच्या उभारणीसाठी मोठा दिलासा देण्यात आला आहे. नाशिक महानगरपालिकेच्या मालकीची अभ्यासिका व वाचनालय इमारत भाडेपट्ट्याने देताना, या भाडेपट्टा करारनाम्याच्या नोंदणीवरील मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरी प्रशासनात सुसूत्रता आणण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने आपली मान्यता दिली आहे.

मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रोजेक्टच्या अध्यक्षांच्या कार्यालयाचे कामकाज अधिक सुरळीत चालण्यासाठी नव्याने चार पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

दैनिक लोकविजय



# बुद्धीची देवता

संपूर्ण जनतेच्या ममत्त्वाचा, दैवत्वाचा, अस्मितेचा, श्रद्धाळू असा हा एकमेव गणेश. गणरायाचे आगमन म्हणजे सर्वांसाठी आनंदाची पर्वणीच असते. जोरदार सरींची बरसात झेलून सुखावलेले समस्त जीव आता उत्सव पर्वामध्ये चिंब भिजण्यासाठी सज्ज झाले आहेत. विघ्न दूर करून सुखाची चाहूल देणाऱ्या बाप्पाचे आज आगमन झाले. ऐलमा, पैलमा गणेश देवा, माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा... अवतीभवतीचा आनंद व उत्साहाच्या हिरव्यागार वातावरणात भाविकांनी गणेशाचे स्वागत केले.

प्रत्येकाच्या घरोघरी उत्सवाची सज्जता सुरू असल्यामुळे भारलेले वातावरण अनुभवायला मिळत असते. वास्तविक गणेश हा विद्येचा देव आणि ज्ञानाचा अधिपती. सण आणि उत्सव साजरे करताना आपण संस्कृती परंपरेचा प्रवाह पुढे नेत असतोच. आपल्या समाज सुधारकांनी मात्र उत्सव आणि परंपरा यांचा विचार राष्ट्रासाठी कसा केला याचे उत्तम उदाहरण म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव. सार्वजनिक गणेशोत्सवाचा उल्लेख जेव्हा जेव्हा होतो तेव्हा लोकमान्य टिळकांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे.

गणेशोत्सवाची सुरुवात झाली ती भारतीयांना एकत्र आणण्यासाठी, विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी. १८९३ साली स्थापन केलेला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा अनोखा प्रयत्न. जो पुढे जाऊन यशस्वी झाला. एका मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापासून सुरुवात होऊन घराघरांत, मंडपात गणराज विराजमान झाले आहेत. जीवनात अनोखे रंग भरणारा, स्नेह, प्रेम वाढवणारा हा उत्सव आहे. आजच्या घडीचे संघटन, शक्तीचे प्रतीक दर्शवितो. हे सर्व करत असताना या आनंदमय वातावरणात सर्व समाजाने एकत्र यावे त्यांच्यात बंधुभाव वाढीस लागावा, एकमेकांप्रती प्रेम, आपुलकी निर्माण व्हावी या उदात्त हेतूने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करण्यात आली.

चातुर्मासात श्रावणसरींनी आलेला पाऊस आपल्याबरोबर हिंदू सणांना घेऊन येतो. हिंदू धर्मातील ईश्वराची रूपे वेगळी असली तरी शेवटी सर्वांचा ईश्वर एकच आहे. हे निस्सीम सत्य विसरता कामा नये. चौदा विद्या, चौसष्ट कलेचा अधिपती असलेल्या श्रींचे आगमन सर्वांसाठी आनंदरुपी अमृत सोहळा आहे. बाप्पा आला रे आला... किती जिव्हाळ्याचा आतून येणारा आवाज. गोंडस, गोजिरवाणा, लोभस, लडिवाळ, सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन वाजत गाजत मोठ्या उत्साहात घरोघरी, गल्लोगल्ली, शहरात तसेच गावात झाले आहे. घरामध्ये गणपती बाप्पा जेव्हा विराजमान होतात तेव्हा घराचे मंदिर आपोआपच होऊन जाते. या पवित्र वातावरणात कधी दहा दिवस संपतात तेच समजत नाही. यामध्ये गौरी आगमन, गौरी पूजन व गौरी गणपती विसर्जन हे सण उत्सव आनंदात साजरे केले जातात. आपल्याकडे सर्व असतातच यासाठीच की मरगळलेल्या मनाला पुन्हा चैतन्य ऊर्जा मिळावी ही ऊर्जा मिळताना मनामध्ये पवित्र भाव असावा. अनेक पिढ्यान पिढ्यांपासून बाप्पाची अतिशय मनोभावे पूजा केली जाते. लहान मुलांपासून ते वडीलधाऱ्यापर्यंत श्री गणेशाचे आगमन झाल्यावर प्रत्येकजण बाप्पाची सेवा करण्यात दंग होऊन जातो. कारण गणेश दैवत हे बुद्धीची देवता आहे. तसेच तो विघ्नहर्ता ही आहे. प्रथम पूजेचा शुभारंभाचा मान श्री गणेशाकडे जातो. अशा गणाचा अधिपती असलेल्या श्री गणेशाचे स्थान आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण आहे. बाप्पाचा आवडता प्रसाद मोदक. बाप्पाच्या नैवेद्याचा आधीच जिभेवर उड्या मारायला लागतो. या दिवसात एक वेगळेच वातावरण न्याहाळायला मिळत असते. बाप्पा विराजमान झाल्यावर विविध सुगंधी अगरबत्त्यांचा दरवळणारा सुवास, शेणाने सारवलेले अंगण, मातीच्या भिंतींना केलेली पानाफुलांची रंगरंगोटी, दाराला लावलेले तोरण, रांगोळीने सजलेले अंगण मन प्रसन्न करते. बाप्पाच्या आगमनामुळे रक्ताची नाती जवळ येतात, उत्साह, आनंदाचे वातावरण निर्माण होते.

वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटि समप्रभें निर्विघ्न कुरुमे देव, सर्वकार्येषु सर्वदा! गोलाकार सोंडेचा, विशाल शरीराचा, सूर्या समान तेजस्वी अशा विघ्नहर्ताची आमच्यावर कृपा असावी. आपल्या या वैदिक संस्कृतीमध्ये एक दयाळू देवता श्री गणेश विघ्नहर्ता बुद्धिवंत, सामर्थ्यवंत, शक्तीवन्त, रूपवंत देवता आहे. गणेश या संस्कृत शब्दाप्रमाणे अर्थ गण म्हणजे समूह तर ईश म्हणजे परमेश्वर.

गणपती म्हणजे प्राणिमात्रांच्या समूहाचे रक्षण करणारा रक्षक. गणेश हा महादेव आणि पार्वतीचा पुत्र आहे. याबद्दलची गोष्ट प्रत्येकाला माहीतच आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून वेद व्यासांनी डोळे मिटवून भागवत कथा सलग दहा दिवस गणपतीला ऐकवली. जी गणपतीने आपल्या दाताने लिहिली. दहा दिवसानंतर जेव्हा व्यासांनी डोळे उघडले तेव्हा त्यांनी पाहिले की, गणेश एका जागी सतत बसून लिहिल्यामुळे अतिशय उष्णता शरीरात निर्माण झाली. त्यामुळे जवळील पाण्याच्या कुंडात वेद व्यासांनी त्यांना थंड केले. त्यामुळेच भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणरायाची स्थापना केली जाते आणि शितल करण्यासाठी अनंत चतुर्दशीला विसर्जन केले जाते.

गणेश उत्सव हा बाल आणि तरुणांसाठी एक आनंदोत्सवच असतो. अशा वातावरणात कल्पनाशक्तीला वाव मिळतो. कौशल्याच्या सादरीकरणाची संधी मिळते. नवनवीन मित्र-मैत्रिणी गवसतात, एकत्र काम केल्यामुळे सुसंवादाला चालना मिळते. सगळे एका पातळीवर येऊन काम करत असल्यामुळे जवळीकता वाढते. एकप्रकारे या अनौपचारिक वातावरणात मैत्री फुलते. दोस्ती घट्ट होते. एकंदरीत संपूर्ण समाज या महोत्सवात विरघळून जातो, रममान होतो.

श्री गणेश विद्येची देवता आहे. तसेच ती कलेची ही देवता आहे. त्यामुळे कलाकार मंडळी ही गणेश उत्सवामध्ये आपली कला सादर करण्यासाठी रंगून गेलेले असतात. गणपतीसमोर ठेवलेले लाडू, मोदक असे गोड पदार्थ लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतात. त्यामुळे गणेशोत्सवामध्ये बाळ गोपाळही रमून जातात.

काहींच्या घरी दीड दिवसाचे गणपती तर काहींच्या घरी सात दिवसांचे गणपती असतात. पंचमी दिवशी दीड दिवसाचे गणपती जातात. त्यादिवशी ऋषीपंचमी साजरी केली जाते. याच दिवसात गौरीचे आगमन होते. गौरी पूजन आणि विसर्जनाचा सोहळा पार पडतो. काही गणपतीचे विसर्जन गौरी सोबतच होते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सर्वच गणपतीचे विसर्जन होते.

# स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२६ मध्ये छत्रपती संभाजीनगरची उल्लेखनीय झेप

## ३४व्या क्रमांकावरून १६व्या क्रमांकावर झेप; १७८ गुणांसह शहराची दमदार कामगिरी

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या 'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२६' मध्ये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने उल्लेखनीय कामगिरी करत १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ४८ शहरांच्या श्रेणीत देशात १६वा क्रमांक पटकावला आहे. शहराला २०० पैकी १७८ गुण प्राप्त झाले आहेत. विशेष म्हणजे, मागील वर्षी छत्रपती संभाजीनगरचा ३४वा क्रमांक होता. यंदा शहराने तब्बल १८ क्रमांकांची सुधारणा करत देशातील आघाडीच्या शहरांच्या यादीत स्थान मिळिवले आहे. ही कामगिरी शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणासाठी महानगरपालिकेमार्फत सातत्याने राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजना, प्रभावी कचरा व्यवस्थापन, धूळ नियंत्रण, कचरा जाळण्यास प्रतिबंध, पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था आणि नागरिकांमध्ये करण्यात आलेल्या जनजागृतीचे फलित आहे.

### १८ स्थानांची झेप; शहराच्या पर्यावरणपूरक वाटचालीला बळ - आयुक्त अमोल येडगे

छत्रपती संभाजीनगरने २०२५ मधील ३४व्या क्रमांकावरून २०२६ मध्ये १६व्या क्रमांकावर झेप घेत १८ स्थानांची सुधारणा केली असून, १५५ गुणांवरून १७८ गुणांपर्यंत मजल मारत २३ गुणांची वाढ नोंदविली आहे. ही कामगिरी शहराच्या पर्यावरणपूरक विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा असून, आगामी काळात वायू प्रदूषणाच्या प्रमुख स्रोतांवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण मिळिवणे, पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देणे, कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करणे आणि नागरिकांचा सहभाग वाढविणे यावर महानगरपालिकेचा भर राहणार आहे. महानगरपालिकेच्या वतीने यापुढेही 'स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त छत्रपती संभाजीनगर' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून वायू प्रदूषण नियंत्रणासाठी अधिक प्रभावी आणि शाश्वत उपाययोजना राबविण्यात येणार आहेत, असे महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी सांगितले.

### 'स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त छत्रपती संभाजीनगर' हे आपले सामूहिक उद्दिष्ट - महापौर समीर राजूरकर

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२६ मध्ये केलेली उल्लेखनीय कामगिरी ही शहराच्या पर्यावरणपूरक वाटचालीतील महत्त्वपूर्ण यश आहे. यंदा ३४व्या क्रमांकावरून १६व्या क्रमांकावर झालेली झेप ही महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांसोबतच नागरिकांच्या सहभागाचेही फलित आहे. सध्या महानगरपालिकेच्या माध्यमातून स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, धूळ नियंत्रण, पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणाच्या दिशेने विविध कामे सुरू आहेत. या कामांना आगामी काळात आणखी गती देण्यात येणार असून, यामुळे पुढील वर्षी स्वच्छ सर्वेक्षण तसेच स्वच्छ वायू सर्वेक्षणामध्ये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यापेक्षा अधिक चांगली कामगिरी करेल, असा मला पूर्ण विश्वास आणि आशावाद आहे. 'स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त छत्रपती संभाजीनगर' हे आपले सामूहिक उद्दिष्ट आहे.

**धूळ नियंत्रणावर विशेष भर**

शहरातील वायू प्रदूषणामध्ये रस्त्यांवरील धूळ हा महत्त्वाचा घटक असल्याने महानगरपालिकेच्या वतीने रस्ते व प्रमुख मार्गांची नियमित स्वच्छता, यांत्रिक पद्धतीने साफसफाई, रस्त्यांच्या कडांची स्वच्छता तसेच धुळीचे पुनर्वितरण होणार नाही यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. प्रमुख रस्ते, चौक, वाहतूक मार्ग तसेच गर्दीच्या ठिकाणी नियमित स्वच्छता राखण्यावर भर देण्यात येत असून, रस्त्यांवर साचणारी माती व धूळ वेळोवेळी हटविण्यात येत आहे. यामुळे वाहनांच्या वर्दळीमुळे धुळीचे कण पुन्हा हवेत मिसळण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत होत आहे.

**बंदिस्त वाहनातून कचरा वाहतूक** - शहरातील संपूर्ण कचरा संकलन व वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध करण्यासाठी बंदिस्त वाहनांमधून कचरा वाहतूक करण्यात येत आहे. यामुळे कचरा वाहतुकीदरम्यान रस्त्यावर कचरा पडणे, दुर्गंधी निर्माण होणे तसेच कचऱ्यातील सूक्ष्म कण हवेत मिसळणे यावर नियंत्रण मिळिवण्यास मदत होत आहे. तसेच यंत्रणेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, शहरातील विविध भागांतून संकलित करण्यात आलेला कचरा निर्धारित पद्धतीने ट्रान्सफर स्टेशनपर्यंत आणून तेथून मोठ्या क्षमतेच्या कॅप्सूल स्वरूपाच्या बंदिस्त वाहनांद्वारे प्रक्रिया केंद्राकडे पाठविण्यात येत आहे. या व्यवस्थेमुळे कचऱ्याची वाहतूक अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पद्धतीने होत असून, शहरातील कचरा व्यवस्थापनाचा एकूणच दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे.

**कचरा जाळण्यास प्रतिबंध** - शहरात उघड्यावर कचरा जाळण्यास प्रतिबंध करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने सातत्याने जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांना कचरा न जाळता तो महानगरपालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेकडे देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या पथकांमार्फत विविध भागांमध्ये नियमित पाहणी करण्यात येत असून, उघड्यावर कचरा जाळण्याचे प्रकार आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे. यासोबतच ओला व सुका कचरा स्त्रोतावरच वेगळा करणे, नियमित कचरा संकलन आणि कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट यावर भर देण्यात येत आहे.

**दंडात्मक कारवाईला अधिक प्रभावी स्वरूप**




- शहरातील स्वच्छता व पर्यावरणाच्या दृष्टीने नियमांचे पालन व्हावे यासाठी महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच नागरिक मित्र पथकांमार्फत नियमित तपासणी व दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी अथवा मोकळ्या जागेत कचरा टाकणे, कचरा जाळणे, कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन करणे, अस्वच्छता निर्माण करणे, प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करणे तसेच सार्वजनिक ठिकाणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिक व व्यावसायिकांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या पथकांकडून शहरातील विविध भागांमध्ये अचानक पाहणी, नियमित गस्त तसेच तक्रारी प्राप्त झालेल्या ठिकाणी तत्काळ कारवाई केली जात आहे. कचरा कुठेही टाकू नये, जाळू नये आणि सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण करू नये, यासाठी कारवाईसोबतच नागरिकांचे प्रबोधनही केले जात आहे. विशेषतः कचरा जाळण्यामुळे निर्माण होणारा धूर व सूक्ष्म कण थेट हवेच्या गुणवत्तेवर परिणाम करतात. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी दंडात्मक कारवाईसोबतच संबंधित परिसरातील नागरिकांना पर्यावरणीय दुष्परिणामांची माहिती देऊन जनजागृती करण्यात येत आहे.

या 'जनजागृती + प्रतिबंध + नियमित निरीक्षण + दंडात्मक कारवाई' या चारही स्तरांवरील उपाययोजनांमुळे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यास तसेच वायू प्रदूषणाच्या संभाव्य स्रोतांवर नियंत्रण ठेवण्यास मदत झाली आहे. पर्यावरणपूरक वाहनांचा वाढता वापर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन व्यवस्थेत पर्यावरणपूरक e-vehicles चा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येत आहे. घराघरातून कचरा संकलन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्यात आल्याने कचरा संकलनाच्या प्रक्रियेतून होणारे पारंपरिक इंधनावरील वाहनांचे उत्सर्जन कमी करण्यास मदत होत आहे. इलेक्ट्रिक वाहनांमधून थेट धूर किंवा tail-ppie emission होत नसल्याने शहरातील स्थानिक पातळीवरील वायू प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने त्यांचा वापर महत्त्वपूर्ण ठरत आहे.

विशेषतः घरगुती कचरा संकलनासाठी शहरातील विविध भागांमध्ये सातत्याने फिरणाऱ्या वाहनांमध्ये e-vehicles चा वापर केल्यामुळे कचरा व्यवस्थापन आणि वायू प्रदूषण नियंत्रण या दोन्ही उद्दिष्टांना एकाच वेळी चालना मिळत आहे. तसेच भविष्यात कचरा संकलन व वाहतूक व्यवस्थेमध्ये अधिकाधिक पर्यावरणपूरक वाहनांचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. पारंपरिक इंधनावरील वाहनांवरील अवलंबित्व कमी करून स्वच्छ ऊर्जा, कमी उत्सर्जन आणि पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन या दिशेने शहराची वाटचाल सुरू आहे.

**बांधकाम व पाडकामातील धूळ नियंत्रण**- बांधकाम व पाडकामातून निर्माण होणाऱ्या धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित आस्थापनांना आवश्यक सूचना देणे, बांधकाम साहित्याची योग्य हाताळणी, धूळ निर्माण होणाऱ्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. बांधकाम साहित्य रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी विखुरले जाणार नाही, तसेच त्यातून धूळ निर्माण होणार नाही यासाठी संबंधितांना आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**वाहतूक व प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना**- वाहनांमधून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे, रस्त्यांची स्वच्छता राखणे, रस्त्यांवरील धूळ कमी करणे आणि सार्वजनिक ठिकाणी प्रदूषण नियंत्रणाबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात येत आहे.

**हरित क्षेत्र व पर्यावरण जनजागृतीला चालना** - शहरातील हरित क्षेत्र वाढविणे, वृक्षारोपण, नागरिकांमध्ये स्वच्छ हवा व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करणे, तसेच विविध शासकीय व सामाजिक संस्थांच्या सहभागातून पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येत आहेत. नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी स्वच्छ हवा, स्वच्छता, कचरा वर्गीकरण, कचरा न जाळणे, प्लास्टिकचा कमी वापर आणि पर्यावरणपूरक जीवनशैली याबाबत विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे.

**AQI हवेच्या गुणवत्तेच्या निर्देशांकात सुधारणा**

शहरात पर्यावरणाच्या दृष्टीने करण्यात आलेल्या सातत्यपूर्ण उपाययोजनांमुळे मागील वर्षीचा AQI 99 असलेला निर्देशांक यावर्षी AQI 76 पर्यंत खाली आल्याचे नोंदविण्यात आले आहे. हवेच्या गुणवत्तेत झालेली ही सुधारणा शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणाच्या प्रयत्नांना मिळालेले सकारात्मक फलित असून, स्वच्छ वायू सर्वेक्षणातील शहराच्या कामगिरीत सुधारणा होण्यास त्याचा हातभार लागला आहे.

**सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित**

स्वच्छ वायू सर्वेक्षणामध्ये शहराची कामगिरी ही केवळ एका विभागाची नसून महानगरपालिकेचे विविध विभाग, संबंधित शासकीय यंत्रणा, स्वच्छता कर्मचारी, नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि शहरातील विविध घटक यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे यांच्या

मार्गदर्शनाखाली तसेच पर्यावरण विभाग आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त श्री. नंदकिशोर भोंबे यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, धूळ नियंत्रण, पर्यावरणपूरक वाहनांचा वापर, दंडात्मक कारवाई आणि जनजागृतीच्या विविध उपाययोजनांना गती देण्यात आली आहे.

# ओबीसीसारख्या सवलती मराठा समाजास देतांना केजी ते पीजी सवलती द्या

## वैद्यकीय-अभियांत्रिकी आणि व्यवसाईक व परदेशी शिक्षणात सवलती द्याव्यात !

## अराजकीय आरक्षण द्या व समाज मनातील आक्रोश दूर करा व सुधारीत शासनादेश काढा

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणा संदर्भातील न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल पाहिला तर त्याच्या मुख्य शिफारशींचा गाभा पाहता ओबीसी सारख्या सवलती मराठा समाजास देतांना केजी ते पीजी सवलती द्या, वैद्यकीय- अभियांत्रिकी- व्यवसाईक - अव्यवसाईक अभ्यासक्रम व परदेशी शिक्षणात सवलती, वयो मर्यादा सवलत द्याव्यात आणि अराजकीय आरक्षण देऊन समाज मनातील आक्रोश दुर करा व सुधारीत शासनादेश काढा अशी महत्वाची समाज मन जोडणारी मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी शासना कडे करून शुक्रे आयोगाचे सविस्तर वाचन केल्याचे सिद्ध केले आहे.



**आयोगाच्या मुख्य शिफारशी**

या बाबत बोलतांना ते म्हणाले की, मराठासमाजाला स्वतंत्र सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग म्हणून मान्यता द्यावी.मराठा समाजा साठी स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करावी, इतर मागासवर्गीयांच्या विद्यमान आरक्षणाला धक्का न लावता. शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये स्वतंत्र आरक्षण द्यावे. असामान्य व अपवादात्मक परिस्थिती असल्याचे नमूद करून ५० टक्के आरक्षणाची घटनात्मक मर्यादा ओलांडण्याचे समर्थन करावे. मराठा समाजातील शैक्षणिक मागासलेपणा, सरकारी सेवांमधीलअपुरे प्रतिनिधित्व आर्थिक अडचणी आणि सामाजिक मागासलेपणा यांचा विचार करावा. आरक्षणासाठी जातनिहाय व सामाजिक- आर्थिक सर्वेक्षणातील आकडेवारीचा आधार घ्यावा अशी महत्वाची नोंद हा अहवाल महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या आयोगाचा असून, आयोगाने राज्यातील सुमारे १ कोटी ५८ लाख कुटुंबांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास केला होता.मात्र, अहवालातील संपूर्ण शिफारशींचे अधिकृत व प्रमाणित स्वरूप सरकारने प्रसिद्ध केलेल्या अहवाल/शासन निर्णयातूनच तपासणे योग्य ठरणार असल्याचे महत्वाचे मत जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मांडताना नमुद केले की, कायद्याच्या दृष्टीने, ५० टक्के मर्यादा ओलांडण्याचे समर्थन करण्यासाठी विशेष परिस्थिती आणि परिमाणात्मक,अद्ययावत-विश्वासार्ह आकडेवारी आवश्यक ठरते; त्यामुळे आयोगाच्या शिफारशींची घटनात्मक वैधता न्यायालयीन परीक्षणाच्या अधीन राहते.न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षते खालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या मराठा समाजावरील सर्वेक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये तपासली तर लक्षात येईल की, सर्वेक्षणाची व्याप्ती पाहता सर्वेक्षण राज्यभर करण्यात आले.ग्रामीण तसेच शहरी भागातील मराठा आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचा समावेश करण्यात आला. सुमारे १ कोटी ५८ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण झाल्याचे सांगण्यात आले; त्यातून सुमारे अडीच कोटी व्यक्तींची माहिती संकलित झाल्याचे राज्य सरकारने नमूद केले. हे सर्वेक्षण २३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत पूर्ण करण्यात आले. सर्वेक्षणाची विषयवस्तू सर्वेक्षणात मराठा समाजाच्या अनेक बाबींचा अभ्यास करण्यात आला-सामाजिक स्थिती आणि सामाजिक मागासले पणा शैक्षणिक स्थिती व शिक्षणातील सहभाग. सरकारी नोकरी आणि सार्वजनिक सेवांमधील प्रतिनिधित्व आर्थिक स्थिती, उत्पन्न आणि रोजगार ग्रामीण-शहरी जीवन मानातील फरक


जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची मागणी

कुटुंबांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती आत्महत्या, शेती, कर्जबाजारीपणा व उपजीविकेशी संबंधित परिस्थिती आणि विशेष म्हणजे 'सांख्यिकीय पद्धती' आयोगाने मोठ्या प्रमाणावर कुटुंबाधारित प्रत्यक्ष सर्वेक्षण केले.माहिती संकलनासाठी संरचित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला असुन मराठा समाजाची स्थिती इतर समाजघटकांशी आणि खुल्या प्रवर्गाशी तुलना करण्याचा प्रयत्न करण्यात आला.आयोगाने आपल्या अभ्यासाला राज्यातील मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणाचा तपशीलवार व सखोल अभ्यास असे स्वरूप दिले. विशेष वैशिष्ट्ये असे की,अत्यंत मोठ्या प्रमाणातील सर्वेक्षण -राज्यातील जवळपास सर्व मराठा कुटुंबां पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला असुन ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रांचा समावेश- सर्वेक्षण केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित नव्हते तर बहुआयामी अभ्यास- फक्त आर्थिक निकषांऐवजी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक निकषांचा एकत्रित विचार करण्यात आला.

आरक्षणाच्या घटनात्मक परीक्षणा साठी आकडेवारीचा आधार-सरकारी नोकरी व शिक्षणातील प्रतिनिधित्व, मागासलेपण आणि विशेष परिस्थिती सिद्ध करण्या साठी परिमाणात्मक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु पुढे बोलतांना जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी चर्चेतील आक्षेप देखील नमुद केला असुन या सर्वेक्षणाच्या कार्यपद्धतीवर काही आक्षेप ही घेण्यात आले. विशेषत सर्वेक्षणाचा कालावधी अत्यंत कमी होता, प्रश्नावली व नमुना-निवडीची पद्धत, आकडेवारीची स्वतंत्र पडताळणी आणि अहवालातील निष्कर्षांची विश्वासार्हता याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यामुळे सर्वेक्षणाची वैशिष्ट्ये सांगताना व्यापकता आणि जलद अंमलबजावणी ही दोन्ही परस्परविरोधी बाजू लक्षात घेणे आवश्यक आहे. आयोगाने व्यापक माहिती संकलित केल्याचा दावा केला, तर टीकाकारांनी अल्पकाला वधीत केलेल्या संकलना मुळे पद्धतशास्त्रीय त्रुटी राहू शकतात अशी चर्चा पुढे आली आहे.परंतु वास्तविकता अशी आहे की, न्या. शुक्रे आयोगाच्या सर्वेक्षणात खुल्या प्रवर्गाचा स्वतंत्र तुलना-गट म्हणून समावेश करण्यात आला होता. आयोगाने मुख्यतः मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सर्वेक्षण केले इतर मागासवर्गीय- अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींचे स्वतंत्र व्यापक सर्वेक्षण करण्यात आले नाही, अशी नोंद उपलब्ध वृत्तांतांत आहे. खुल्या प्रवर्गाचा समावेश कसा केला. मराठा कुटुंबांप्रमाणेच खुल्या प्रवर्गातील कुटुंबांकडून माहिती घेण्यात आली. शहरी आणि ग्रामीण भागातील कुटुंबांचा समावेश करण्यात आला. घराघरांत जाऊन प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित करण्यात आली. प्रश्नावलीत सुमारे १५० ते १५४ प्रश्न होते या प्रश्नांमध्ये कुटुंबाचे उत्पन्न व आर्थिक स्थिती शिक्षण, रोजगार व सरकारी सेवांतील प्रतिनिधित्व महिलांची स्थिती आरोग्यसेवा व उपचारांची उपलब्धता पाणी व मूलभूत सुविधा बालमृत्यू, कुपोषण आणि सामाजिक परिस्थिती तुलना-गट म्हणून भूमिका खुल्या प्रवर्गातील कुटुंबांची माहिती मराठा समाजाच्या स्थितीशी तुलना करण्या साठी वापरण्यात आली.म्हणजेच मराठा समाज सामाजिक-शैक्षणिक दृष्ट्यामागास आहे का, हे ठरवताना खुल्या प्रवर्गातील सामाजिक शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक स्थितीशी तुलनात्मक विश्लेषण करण्यात आलेले असुन महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा येथे खुला प्रवर्ग म्हणजे एकसंध जातसमूह नव्हे. खुल्या प्रवर्गातील जागा सर्व जातींसाठी खुल्या असतात; त्यामुळे त्यात विविध सामाजिक व आर्थिक स्तरांतील व्यक्ती असू शकतात.म्हणून खुल्या प्रवर्गाला एकसंध अ-मागास समूह मानून केलेली तुलना ही आयोगा च्या पद्धतशास्त्रातील महत्त्वाची बाब ठरते आणि तिच्या वैधतेवर काहीआक्षेपही घेण्यात आले असे नमुद करून जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या मराठा समाजा वरील सर्वेक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सर्वेक्षणाची व्याप्ती सर्वेक्षण राज्यभर करण्यात आले. ग्रामीण तसेच शहरी भागातील मराठा आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचा समावेश करण्यात आला.सुमारे १ कोटी ५८ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण झाल्याचे सांगण्यात आले; त्यातून सुमारे अडीच कोटी व्यक्तींची माहिती संकलित झाल्याचे राज्य सरकारने नमूद केले. हे सर्वेक्षण २३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ या अल्प कालावधीत पूर्ण करण्यात आले.

सर्वेक्षणाची विषयवस्तू सर्वेक्षणात मराठा समाजाचा विविध अंगाचा अभ्यास करण्यात आला-सामाजिक स्थिती व सामाजिक मागासलेपणा. शैक्षणिक स्थिती व शिक्षणातील सहभाग.सरकारी नोकरी आणि सार्वजनिक सेवांमधील प्रतिनिधित्व. आर्थिक स्थिती, उत्पन्न आणि रोजगार ग्रामीण-शहरी जीवन मानातील फरक. कुटुंबांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती आत्महत्या, शेती, कर्जबाजारीपणा आणि उपजीविकेशी संबंधित परिस्थिती. सांख्यिकीय पद्धतीआयोगाने मोठ्या प्रमाणावर कुटुंबाधारित प्रत्यक्ष सर्वेक्षण केले. माहिती संकलनासाठी संरचित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. मराठा समाजाची स्थिती इतर समाजघटकांशी आणि खुल्या प्रवर्गाशी तुलना करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

आयोगाने आपल्या अभ्यासाला राज्यातील मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणाचा तपशीलवार व सखोल अभ्यास असे स्वरूप दिले. विशेष वैशिष्ट्ये अत्यंत मोठ्या प्रमाणातील सर्वेक्षण -राज्यातील जवळपास सर्व मराठा कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रांचा समावेश-सर्वेक्षण केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित नव्हते तर बहु आयामी अभ्यास- फक्त आर्थिक निकषांऐवजी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक निकषांचा एकत्रित विचार करण्यात आला. आरक्षणाच्या घटनात्मक परीक्षणासाठी आकडेवारीचा आधार- सरकारी नोकरी व शिक्षणातील प्रतिनिधित्व, मागासलेपण आणि विशेष परिस्थिती सिद्ध करण्या साठी परिमाणात्मक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे नमुद करतांना जेष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी या अहवालाचे सखोल निरीक्षण केले नसल्याचा दावा आपोआप खोटा व अयोग्य असल्याचे सिद्ध झाले असुन त्यांचे अन्नत्याग आंदोलन उपोषण म्हणूनच राज्य सरकारची डोकेदुखी ठरली असल्याची बाब संपूर्ण महाराष्ट्रात चर्चीली जात आहे हे विशेष होय.

# 'प्रकाशगाथा, महावितरणच्या मानव संसाधनाची' पुस्तकाचे प्रकाशन

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) – महावितरणच्या मानव संसाधन विभागाने गेल्या सव्वा वर्षात राबवलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, धोरणात्मक निर्णय आणि कर्मचारी कल्याणाच्या योजनांचा लेखाजोखा मंडणाऱ्या 'प्रकाशगाथा, महावितरणच्या मानव संसाधनाची' या पुस्तकाचे प्रकाशन ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ११) झाले.



महावितरणच्या 'प्रकाशगड' मुख्यालयात आयोजित कार्यक्रमाला संचालक श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत (मानव संसाधन), मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री मा. मेघना साकोरे–बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) मा. आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र, स्वतंत्र संचालक मा. विश्वास पाठक यांनी या पुस्तकाच्या शुभेच्छा संदेशामध्ये मानव संसाधन विभाग आणि अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांच्या विविध उल्लेखनीय कामांचा गौरव केला आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी मानव संसाधन विभागाला गेल्या सव्वा वर्षांच्या कार्यकाळात विविध कल्याणकारी निर्णय आणि उपक्रमांच्या माध्यमातून लोकाभिमुख व कर्मचारीभिमुख चेहरा मिळवून दिला आहे.

शून्य विद्युत अपघातासाठी विविध उपाययोजना, विश्वविक्रमी विद्युत सुरक्षा जनजागृती अभियान, महिला कर्मचारी सक्षमीकरण व सन्मान, अभियंते व जनमित्रांचा सन्मान, कर्मचारी संघटनांशी मासिक संवाद, कौटुंबिक स्नेहमेळावे, हरित ऊर्जेसाठी अर्थसाहाय्य, क्रीडा व नाट्यस्पर्धा, प्रशिक्षण व भरती प्रक्रिया, कर्मचारी कुटुंबांसाठी विविध कल्याणकारी योजनांच्या आर्थिक तरतूदीत वाढ आणि या सर्वांची अंमलबजावणी यावर हे पुस्तक आधारित आहे.

उपमुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. निशिकांत राऊत यांनी या पुस्तकाचे लेखन व संपादन केले आहे. या कार्यक्रमाला विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता श्री. मंगेश कोहाट, मुख्य अभियंते सर्वश्री सुनील काकडे, दिपक कुमठेकर, राजेश नाईक, दत्तात्रेय बनसोडे, सुंदर लटपटे, चंद्रमणी मिश्रा, अरविंद बुलबुले, ज्ञानेश कुलकर्णी, अंकुर कावळे, पवनकुमार कच्छोट, पंकज तगलपल्लेवार, राजाराम माने, अनिल डोये यांच्यासह अधिकारी व अभियंते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक (मानव संसाधन) यांचे तांत्रिक सहायक डॉ. संतोष पाटणी यांनी केले व आभार मानले.

# वैजापूरात छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार-२०२६चे शानदार कार्यक्रमात वितरण



वैजापूर, दि. १५ (प्रतिनिधी) – राज्यातील विविध क्षेत्रात अत्यन्त नाविन्यपूर्ण, उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक, राष्ट्रीय, शैक्षणिक व कौटुंबिक कामगिरी उत्कृष्टपणे बजावणाऱ्या २५ रत्नांना श्री. छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार–२०२६ येथील वनश्री हॉटेलमध्ये रविवार (१३) रोजी मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, गौरवप्रमाण, शाल, बुके देऊन या महाराष्ट्राच्या रत्नाना गौरविण्यात आले. तालुक्यातील नागमठाण येथील जिजाऊ बहुउद्धेशिय सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सूर्यकांत रामदास मोटे पाटील होते.

तर प्रमुख अतिथी म्हणून लातूर, विभागीय शिक्षण मंडळच्या सचिव श्रीमती अनुपमा शीला रामचंद्र भंडारी, बजाजचे इंजिनिअर मारुती कृष्णा देसाई, होम मिनिस्टर, झी टॉकीज फेम कलाकार संदीप जाधव व मराठवाड्याचे बालकवी, लेखक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांची उपस्थिती होती.

आरंभी गणेश चतुर्थीनिमित्त विघ्नहर्ता, सुखकर्ता दुःखहर्ता. श्री.गणेश महापूजन व हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून 'जिजाऊ वंदनाने 'कार्यक्रम आरंभ झाला.

प्रास्ताविक आयोजक सूर्यकांत लीलावती रामदास मोटे यांनी करून पुरस्कार आयोजन हेतू कथित केला.गेल्या सात वर्षांपासून हे पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील गुणवंत व यशवंत रत्नाना दिले जातात. श्रीमती भंडारी, श्री. संदीप जाधव, श्री देसाई यांनी पुरस्काराने वाढलेल्या जबाबदारीची जाणीव पुरस्कारर्थी यांना करून देऊन भविष्यात आणखी चांगल्या कामाची अपेक्षा केली.

सविता वडगावकर, उर्मिला शेळके, तान्हाजी लांडे, विजय कोल्हे, यांनी मनोगत व्यक्त केले. श्रीमती जयश्री मोटे, केद श्रीमती जयश्री मोटे, केदार मोटे, सूर्यकांत मोटे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. सूत्र संचलन धोंडीराम राजपूत यांनी केले तर आभार केदार मोटे यांनी मानले.

# 'समन्वय महर्षी बाळासाहेब नाईक' स्मृतिग्रंथाचे २० सप्टेंबरला प्रकाशन

## पू. स्वामी श्री. गोविंददेव गिरी महाराजांची विशेष उपस्थिती

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून तसेच विश्व हिंदू परिषदेचे परम आदरणीय अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कै. बाळासाहेब नाईक यांच्या कार्याचा परिचय करून देणाऱ्या 'समन्वय महर्षी बाळासाहेब नाईक' या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. यावेळी श्री. दीपक जेवणे लिखित 'स्थितप्रज्ञ' या पुस्तकाचेही प्रकाशन होणार आहे.

विश्व हिंदू परिषद, सा. विवेक आणि निर्मलोत्तम सेवा न्यास, संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्मृतिग्रंथ प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता तापडिया नाट्यमंदिर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथे हा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यास श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास, अयोध्या धाम चे कोषाध्यक्ष पूजनीय स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांचे आशीर्वचन लाभणार आहे. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास विश्व हिंदू परिषदेचे संयुक्त महामंत्री स्वामी विज्ञानानंदजी, सहसत्संगप्रमुख दादा वेदक तसेच हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री रमेश पतंगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कै. बाळासाहेब नाईक यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक कार्याचा परिचय नव्या पिढीला व्हावा, त्यांच्या विचार व कार्याची प्रेरणा समाजापर्यंत पोहोचावी, या उद्देशाने स्मृतिग्रंथाचे प्रकाशन करण्यात येत आहे. या स्मृतिग्रंथ प्रकाशन सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषद, देवगिरी प्रांत, सा. विवेक आणि नाईक परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अधिकारी कर्मचारी गणेश मंडळ श्री प्राणप्रतिष्ठा उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) – महानगरपालिका अधिकारी कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने महानगरपालिका मुख्य कार्यालय परिसरात प्रतीवर्षी श्रीगणपती उत्सव साजरा करण्यात येतो. यावर्षी मा.महापौर श्री.समीर राजूरकर, मा.स्थायी समिती सभापती श्री.अनिल मकरीये व मा.आयुक्त श्री.अमोल येडगे यांचे हस्ते श्री प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष तथा शहर अभियंता श्री.संजय कोंबडे,अतिरिक्त आयुक्त श्री.रणजित पाटील, उप आयुक्त श्री.अभय प्रामाणिक, मुख्य उद्यान अधिकारी श्री.विजय पाटील, सहायक आयुक्त श्रीमती लता पुजारी, श्री प्रविण कुलकर्णी, श्री. अनिल बोंडे, श्री ललित सुर्यवंशी, श्री. जितेंद्र खराडकर, श्री. संजय रगडे, श्री. महेश दुबे, श्री. अविनाश निकम माहिती व जनसंपर्क विभागाचे श्री.अतुल बनकर यांचेसह अनेक अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

यावेळी मा.महापौर व मा.आयुक्त यांनी माझा बाप्पा स्वच्छतेचा राजा या घोष वाक्यानुसार गणेश उत्सवात सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता या सूत्रावर महानगरपालिका काम करणार असल्याचा संदेश दिला. प्लास्टिक मुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी स्वच्छते बाबत जनजागृती करणारे पथनाट्य सादर करण्यात आले.

# वीजचोरीप्रकरणी ९ जणांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) – तालुक्यातील गेवराई, गेवराई तांडा व गिरनेरा तांडा परिसरात ९ ग्राहक आकडे टाकून वीजचोरी करताना आढळले. सर्व आरोपींवर चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर ग्रामीण शाखेचे सहायक अभियंता शेख फेरोज, वरिष्ठ तंत्रज्ञ संजय चव्हाण, तंत्रज्ञ जितेंद्र राठोड यांनी गेवराई, गिरनेरा तांडा येथे वीज कनेक्शन तपासणी मोहीम राबवली. यात काही जण लघुदाब वाहिनीवर आकडे टाकून अनधिकृतपणे वीजवापर करताना आढळून आले.

यात गेवराईतील संगीता शिवसन खरात या ग्राहकाने १५ हजार १८०, युसुफ बाबा सय्यद याने १५ हजार १८०, गिरनेरा तांडा येथील गबू नरसिंग जाधव याने १४ हजार ३५०, सुभाष मगन राठोड याने १४ हजार ३५०, गणेश मगन राठोड याने १४ हजार ३५०, चरणसिंग गोवर्धन जाधव याने १४ हजार ३५०, लताबाई बाबासाहेब ढवळे या ग्राहकाने १५ हजार १८०, रोहिदास लष्कर जाधव याने १४ हजार ३५० व गेवराई तांडा येथील संतोष जयराम केदारे याने १५ हजार १८० रुपयांची वीजचोरी केली.

सर्वांनी ७ हजार ८२१ युनिट वीजचोरी केली. त्यात महावितरणचे १ लाख ३२ हजार ४७० रुपयांचे नुकसान झाले. सर्वांना वीजचोरीची बिले व प्रत्येकी २ हजार रुपये तडजोड शुल्क आकारण्यात आले. मात्र आरोपींनी ही रक्कम भरण्यास टाळाटाळ केली. सहायक अभियंता फेरोज शेख यांच्या फिर्यादीवरून सर्व आरोपींवर चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# वैजापूर शहर व ग्रामीण भागात श्री गणेशाचे वाजत गाजत आगमन



वैजापूर, दि. १५ (प्रतिनिधी) – देशवासियांचे आराध्य दैवत सुखकर्ते –दुःखहर्ता श्री. गणेशजींचे सकाळ पासून ते सायंकाळी उशिरापर्यंत पारंपरिक वाद्य, ढोल व ताशाच्या ताला सुरात गुलाल उधळत,तसेच फटाक्याच्या आतषबाजीत 'श्री' मूर्तीची स्थापना गणेश मंडळ व गणेश भक्तांनी मोठ्या श्रद्धेने केली.

सायंकाळी सात वाजेपर्यंत पोलिसांकडे शहरात जवळपास पन्नास गणेश मंडळांनी तर ग्रामीण भागात १०गणेश मंडळांनी नावनोंदींनी साठी अर्ज केले होते, यानंतर रात्री उशिरापर्यंत ही नोंदणी चालूच होती.पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर मेटे यांनी ही माहिती दिली.

नगरपालिका कार्यालयात मानाच्या 'श्री' मूर्तीची स्थापना नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांच्या हस्ते दुपारी होऊन आरती करण्यात आली.या प्रसंगी सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी तथा जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंगेश नाईकवाडी, विष्णू आलूले, मंजिरी खैरे, स्वरांजली साळुंके, संतोष रत्नपारखी राजू इंगळे, इंजिनीअर श्री.थोरात,पुरोहित –प्रदीप मुळे, पाथर्डीकर, जयपालसिंह राजपूत, जोरे पाटील, जोशी, श्री. ननावरे यांनी सहभाग नोंदविला, पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक विनय सोनावणे यांनी सर्वच मुख्य ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

शहरातील श्री स्वामी समर्थ मंदिर केंद्रात नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी व शिल्पा परदेशी यांच्या हस्ते सायंकाळी सात वाजता आरती व श्री', मूर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली. या प्रसंगी सचिन वाणी, लिमेश वाणी, नगरसेविका लता वाणी, देविदास वाणी, घनश्याम वाणी, बापू गावडे, अविनाश खांबेकर, सी.के. पवार, राम कीसन जोरे, मधुकर साळुंके, उल्हास साळुंके, गुळसकर, सोपान वाणी, शंकर मुळे, राऊत बाबा, धोंडीराम राजपूत, सुरेश आलूले, सुमनबाई आलूले, कार्तिक वाणी यांची उपस्थिती होती.

# मार्केटिंग काय आहे? एक खरा अनुभव

काही दिवसापूर्वी एका मॉल मध्ये गेलो होतो. तिथे घडलेली घटना. मॉल मधील एक कामगारांकडून तांदळाच्या डब्यात चुकून मुगडाळ ओतली गेली. आता ती वेगळी करणे मोठे जिकिरीचे काम. त्याने आपली चूक वरिष्ठांच्या कानावर घातली. त्याने मॅनेजरच्या. मॅनेजर भडकला कामगारास नोकरीवरून काढेन म्हणून दम दिला. बिचारा नोकर घाबरून गप्प होता.

मग मी मधे तोंड घातले. म्हणालो मॅनेजर साहेब एक सुचवू का. माझे बिझनेस डेव्हलपमेंटचे डोके सुरू झाले. मॅनेजर म्हणाले सुचवा. मी म्हणालो चला केबिन मधे जाऊ सगळे. केबिन मधे गेल्यावर मी कामगाराला विचारले डब्यात तांदूळ किती होते. ते म्हणाला ३० किलो. आणि डाळ किती टाकलीस?? १० किलो. मग अजून १० किलो डाळ घाल. मॅनेजर म्हणाले त्याने काय होईल?? मी म्हणालो ते सर्व मिक्स करा आणि त्याची १–१ किलोची पाकिटे करा. त्या सोबत एक गरम मसाल्याची किंवा खिचडी मसाल्याची पुडी द्या. आणि स्पेशल खिचडी पॅक म्हणून २० ते २५ रुपये जादा लावून विक्रीला ठेवा. काय रिस्पॉन्स येतो?? ते पाहू. मॅनेजरना म्हणणे पटले. म्हणाले करून बघतो. मध्यंतरी खुप दिवस मॉल मध्ये गेलो नाही. आज गेलो तर तो कामगार दिसला नाही. वाटलं बिचाऱ्याला काढून टाकलं. तेवढ्यात मॅनेजर साहेबांच बोलावणं आलं. आत गेलो तर त्यांनी उठून माझं अभिनंदन केलं आणि म्हणाले तुमच्यामुळे आमच्या मॉलची विक्री व उत्पन्न वाढलं. खिचडी स्पेशलसाठी खूप मागणी आहे. आणि आम्ही दर आठवड्याला डाळ तांदूळ मुद्दाम मिक्स करतो.

तुम्हाला काय गिफ्ट द्यावे?? मी नकोच म्हणालो पण खूपच आग्रह झाला तेव्हा फक्त एक पेन द्या असे सांगितले. आणि एक वचन घेतले. आमच्या पोस्टल लाइफ इन्शुरन्स च्या पॉलिसी घ्या. पोस्टाने आपल्याला हेच शिकवलंय. चुकीतून सुद्धा फायदा करून घेता येतो.

**– मनोहर पत्की**

अधीक्षक डाकघर, यवतमाळ विभाग (निवृत्त)

# उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे ऐच्छिक दान गणेश मुर्तींचे वाटप



पुणे दि. १४ (प्रतिनिधी)– सालाबाद प्रमाणे यंदाही पिंपळे सौदागर येथील पहिले महिला गणेश मंडळ आणि उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने 'ऐच्छिक दान गणेश मुर्ती वाटप 'या उपक्रमात परिसरातील रहिवाशांना एक हजार गणेश मुर्तींचे वाटप करण्यात आले. या व्यतिरिक्त सार्वजनिक गणेश मंडळांनाही मुर्त्यां देण्यात आल्या. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे गणेश उत्सवाच्या आधी पाच प्रकारच्या गणेश मुर्तींमधून एका मुर्तीची निवड करण्याचा पर्याय रहिवाशांना उपलब्ध करुन त्यानुसार बुकींगची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्यानंतर श्री गणेश उत्सवाच्या आदल्या दिवशीपासून पेणवरुन मागवलेल्या शाडू मातीच्या गणेशमुर्तींचे बुकींग नुसार वाटप केले जाते. यावेळी रहिवाशांकडून ऐच्छिक स्वरुपात दानात जमा झालेली रक्कम दिव्याग विवाह सोहळ्याच्या मदतीसाठी वापरली जाते.

सामाजिक आणि सांस्कृतिक बांधिलकीची जाण ठेऊन पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा व्हावा या हेतूने दरवर्षी उन्नती सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिका विधी समिति सदस्या तथा नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे आणि उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे यांनी सांगितले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# गोडीजी पार्श्वनाथ मंदिरात १४ स्वप्ने व पाळणा महोत्सव संगीतमय भजनांसह थाटात संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) – गोडीजी पार्श्वनाथ मंदिरात १४ स्वप्ने व पाळणा महोत्सव संगीतमय भजनांसह थाटात संपन्न छत्रपती संभाजीनगर शहराच्या मध्यवर्ती असलेल्या अति प्राचीन मश्री गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर, जोहरीवाडा व श्री मुनिसुव्रतस्वामी मंदिर, कर्णपुराम येथे श्री आनंदजी कल्याणजी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट तर्फे आयोजित महापर्वाधिराज पर्युषण आराधने अंतर्गत भगवान महावीर जन्म कल्याणक सोहळा मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला.

**संगीतमय १४ स्वप्न दर्शन हे मुख्य आकर्षण –**

यंदाच्या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मगुजरातचे प्रसिद्ध जैन संगीतकार ऋषभ जैन (ठडग)म यांची संगीतमय प्रस्तुती होती. त्यांच्या म'त्रिशला दुलारे पालना झुले', 'आया पर्युषण हमारा'म या गाजलेल्या भजनांच्या तालावर माता त्रिशलाला पडलेल्या १४ शुभ स्वप्नांचे सजीव सादरीकरण झाले. फुलांनी सजवलेला चांदीचा पाळणा सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

**बोली व जन्मवाचन** – दुपारी १२.३९ वाजता १४ स्वप्ने, पाळणाजी, अष्टमंगल, वार्षिक अष्टप्रकारी पूजा, अखंड दीपक आदी चढाव्यांच्या बोल्या घेण्यात आल्या. भाविकांनी मोठ्या उत्साहात बोली घेऊन पुण्यार्जन केले. त्यानंतर मप.पू. साध्वीजी कोटीगुणाश्रीजी म.सा. आदि ठाणा–६ यांच्या मुखारविंदातून भगवान महावीरांचे जन्मवाचन झाले.

चढावे घेणारे लाभार्थी परिवार – या कार्यक्रमात खालील परिवारांनी चढावे घेऊन लाभ घेतला. श्री. रतीलाल मुगदिया परिवार (नम्रता ग्रुप), सुराणा परिवार, चंद्रकांतभाई शहा परिवार, मनमंदिर परिवार, श्री. विनोदभाई लोढाया परिवार, श्री. विकास रायमाने परिवार, मोमाया परिवार, श्री.डॉ. उमेशजी तातेड परिवार, पुष्पाबेन नविनचंदजी चंडालिया परीवार,श्री. डॉ. इंद्रकुमार जिंदानी परिवार, श्री. अशोकभाई सेठ, श्री. जव्हेरचंद डोसी परिवार, श्री. इंदरचंद मुथा परिवार, श्री. पोपटलाल बावडिया परिवार, चॅम्पियन परिवार, श्री. फागणीया परिवार, मोमाया परिवार, अजंनाबेन अशोकभाई जैन परिवार, मुककीया परीवार. सचिनजी मुगदीया ,परमार परीवार

मुख्य ३ लाभ – श्री भगवानजींना पालण्यात पधरावणे, सर्वप्रथम पाळणा हलवणे, मातोश्री पुष्पाबेन भरतकुमार मुठलीया ह.राजेशभाई केतनभाई भगवानजींना (पाळणाजी) घरी घेऊन जाणे – गुजराथी समाज परिवार, अखंड दीपक मातोश्री शांताबाई गणेशमलजी चॅम्पीयन परिवार. याप्रसंगी मगच्छाधिपती प.पू. अभयदेवसूरीश्वरजी म.सा.म यांच्या प्रेरणेने अभय मांगलिक मंडळातर्फे सर्व लाभार्थींना १४ स्वप्न व अष्टमंगलच्या प्रतिकृती भेट देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी ट्रस्टी श्री. कनकमलजी सुराणा, श्री. रतीलालजी मुगदिया, श्री. जव्हेरचंदजी डोसी यांनी उपस्थित सकल जैन समाजाचे आभार मानले. कार्यक्रमापूर्वी लाभार्थी परिवारातर्फे महाप्रसादी स्वामीवात्सल्य व नंतर चोविहारची व्यवस्था ट्रस्टने केली होती.

# गणेशोत्सवात 'आमचा बाप्पा स्वच्छतेचा राजा'च्या माध्यमातून स्वच्छतेचा जागर

## शहरातील गणेश मंडळे, शाळा व प्रमुख चौकांमध्ये पथनाट्याद्वारे जनजागृती; आतापर्यंत २०० गणेश मंडळांची नोंदणी

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'आमचा बाप्पा स्वच्छतेचा राजा' (२०२६ वर्ष दुसरे) या अभिनव जनजागृती उपक्रमाचा शुभारंभ आज करण्यात आला. गणेशोत्सव हा श्रद्धेचा आणि उत्साहाचा सण असतानाच तो स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि प्लास्टिकमुक्त पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून शहरभर व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ महापौर श्री. समीर राजूरकर, आयुक्त श्री. अमोल येडगे, उपमहापौर श्री. राजेंद्र जंजाळ, सभापती श्री. अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते श्री. समीर साजिद, सभागृह नेते श्री. गोविंद केंद्रे, समाज कल्याण सभापती श्री. जालिंदर शेंडगे, नगरसेवक श्री. बालाजी मुंडे, हाजी शेरखान, काकासाहेब काकडे, रशीद मामु, फिरोज खान, कुणाल खरात, किशोर मानकापे, अतिरिक्त आयुक्त श्री. रणजीत पाटील, घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त श्री. नंदकिशोर भोंबे आदींच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'आमचा बाप्पा स्वच्छतेचा राजा' या उपक्रमाच्या जनजागृती रथाला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत हा जनजागृती रथ शहरातील विविध भागांमध्ये फिरून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिक बंदी, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणार आहे.

**१० दिवस पथनाट्याद्वारे व्यापक जनजागृती**

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत शहरातील विविध भागांमध्ये पथनाट्याच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. शहरातील विविध झोनमध्ये दररोज पथनाट्याचे आयोजन करण्यात येणार असून, दररोज सुमारे ५ गणेश मंडळामध्ये पथनाट्य सादर केले जाणार आहे.

शहरातील प्रमुख गणेश मंडळे, शाळा तसेच महत्त्वाच्या चौकांमध्ये मिळून जवळपास ५० ठिकाणी पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना व विसर्जन करताना पर्यावरणाची काळजी घेणे, निर्माल्य स्वतंत्रपणे जमा करणे, कचऱ्याचे ओला-सुका वर्गीकरण करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे याबाबत नागरिकांना संदेश देण्यात येणार आहे.

**'bappa.org' उपक्रमाची प्रभावी जनजागृती**

यावेळी महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्राचा गणेशोत्सव' या उपक्रमांतर्गत . या उपक्रमाचाही शुभारंभ करण्यात आला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून स्वच्छता, पर्यावरणपूरक उत्सव आणि सामाजिक सहभागाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी bappa.org ची प्रभावी जनजागृती करण्यात येणार आहे. महापालिकेच्या जनजागृती मोहिमेत या उपक्रमाची माहिती गणेश मंडळे, शाळा आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.



**जनजागृती रथातून दररोज शहरभर स्वच्छतेचा संदेश**

गणेशोत्सवाच्या कालावधीत विशेष जनजागृती रथ शहरातील विविध भागांमध्ये फिरणार आहे. दररोज सकाळी हा रथ शहरातील शाळा, गणेश मंडळे, प्रमुख चौक तसेच गर्दीच्या ठिकाणी जाऊन नागरिकांना स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत माहिती देणार आहे. घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, प्लास्टिक बंदी, पर्यावरण संवर्धन, निर्माल्य व्यवस्थापन तसेच गणेशोत्सव स्वच्छ व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

**आतापर्यंत २०० गणेश मंडळांची नोंदणी**

'आमचा बाप्पा स्वच्छतेचा राजा' या उपक्रमाला शहरातील गणेश मंडळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत २०० गणेश मंडळांनी या उपक्रमासाठी नोंदणी केली आहे. गणेश मंडळांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जनजागृतीमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

गणेशोत्सव हा केवळ उत्सव न राहता स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव व्हावा, या उद्देशाने महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत 'आमचा बाप्पा स्वच्छतेचा राजा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिक, गणेश मंडळे, शाळा आणि विविध सामाजिक संस्थांनी या उपक्रमात सहभागी होऊन 'स्वच्छ गणेशोत्सव, पर्यावरणपूरक गणेशोत्सव' साकारण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गणेश मंडळाच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी लोकसंवाद अभियान

## माहिती व जनसंपर्क विभागाचा अभिनव उपक्रम

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम १६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले असून, या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येणाऱ्या गणेश मंडळाच्या ठिकाणी लोकसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शासनाच्या योजनांची माहिती देण्याबरोबरच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा 'लोकसंवाद-२०२६'चा प्रमुख उद्देश आहे.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध शासकीय विभागांच्या स्थानिक तसेच जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी नागरिकांना थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

**विविध विभागांच्या योजनांची माहिती**

प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख व मानाच्या गणेशोत्सव मंडळांमध्ये 'लोकसंवाद' कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

'लोकसंवाद-२०२६'मध्ये कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांसह सर्वच विभागांचा सहभाग असणार आहे.

शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी औजारांसाठी अनुदान, महिला बचत गट तसेच महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या युवक आणि विद्यार्थ्यांसाठीच्या शिक्षण, कौशल्य विकास, शिष्यवृत्ती योजना सवलती यासह विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांसह मोफत तपासणी, औषधोपचार व शिष्यवृत्तीशी संबंधित सुविधांची माहिती देण्यात येणार आहे.

कौशल्य विकास क्षेत्रात कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार कर्ज योजना तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती आदी संस्थांच्या योजनांबाबत युवक व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.याशिवाय महाडीबीटी, सायबर सुरक्षा, माहितीचा अधिकार, आणि आपले सरकार यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही जनजागृती करण्यात येणार आहे.

**आंतरविभागीय समन्वयावर भर**

'लोकसंवाद-२०२६' प्रभावीपणे राबविण्यासाठी कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, सहकार, पणन, कौशल्य विकास, सामाजिक न्याय तसेच पोलीस विभागासह संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येणार आहे.

या कार्यक्रमांमध्ये स्थानिक क्षेत्रीय अधिकारी तसेच जिल्हास्तरीय वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञ प्रत्यक्ष गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन करतील. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांबाबत नागरिकांना थेट आणि अधिकृत माहिती उपलब्ध होणार आहे.

**कार्यक्रमांना व्यापक प्रसिद्धी**

शक्य असेल तेथे कार्यक्रमांचे फेसबुक किंवा युट्यूब लाईव्ह करण्यात येणार असून, सोशल मीडियावर गणेशोत्सव२०२६ आणि लोकसंवाद२०२६ हे हॅशटॅग वापरण्यात येणार आहेत. या माध्यमातून प्रत्यक्ष कार्यक्रमाला उपस्थित राहू न शकणाऱ्या नागरिकांपर्यंतही योजनांची माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे.

ज्या गणेश मंडळांना या कार्यक्रमात सहभाग घ्यावयाचा आहे त्यांनी त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच मुंबई शहर व उपनगर गणेश मंडळानी माहिती व जनसंपर्क विभाग,मंत्रालय मुंबई येथे संपर्क साधावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क विभागामार्फत करण्यात आले आहे.

# पिकांची स्थिती पाहण्यासाठी जिल्हाधिकारी शेतात

## पीक परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवा- जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.



छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील पर्जन्यमानाची स्थिती अद्यापही हवी तशी सुधारलेली नाही. याबाबत कृषी, महसूल, ग्रामविकास या व अन्य सर्व यंत्रणांनी पर्यन्यमान व पीक स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले.

जिल्ह्यातील पीक स्थिती व अनियमित पर्जन्यमानामुळे उद्भवलेल्या स्थितीबाबत आज जिल्हाधिकारी गौडा यांनी आढावा घेतला. दरम्यान आज सकाळी जिल्हाधिकारी गौडा यांनी खडकनारळा ता. गंगापूर येथे जाऊन प्रत्यक्ष पिकांची पाहणीही केली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, मनपा उपायुक्त अंकुश पांढरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी तसेच अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यापर्यंत ४१७.३ मि.मी इतके पर्जन्यमान झाले आहे. सद्यस्थितीत कापूस, मका, सोयाबीन या पिकांवर कमी पर्जन्यमानाचा परिणाम झाला असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात पशुधनासाठी चारा हा पुरेसा उपलब्ध आहे. १० मार्च २०२७ पर्यंत चारा पुरेल असेही सांगण्यात आले. जिल्ह्यात १६ मध्यम प्रकल्प आहेत त्यात २९.९५ टक्के साठा आहे. ९९ लघु प्रकल्प आहेत त्यात ३४.८८ टक्के जलसाठा आहे. जायकवाडी या सर्वात मोठ्या प्रकल्पात यंदा अद्याप पर्यंत ८६.७९ टक्के जलसाठा उपलब्ध आहे.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, यंदाची पर्जन्यमानाची स्थिती पाहता पीक स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत संबंधित यंत्रणांनी दक्ष रहावे,असे निर्देशही त्यांनी दिले.

# सेवा संकल्प अभियानातून नागरिकांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ

## विभागात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या विभागीय आयुक्तांच्या सूचना

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार असून, पात्र नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ व आवश्यक सेवा थेट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिली.

अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्यात सेवा सेतू शिबिर आयोजित करून आपले सरकार सेवा केंद्रामार्फत अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, जिवंत सातबारा, स्वामित्व सनद वाटप, शेत व पाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, वन हक्क दावे, मालमत्ता हस्तांतरण नोंद, नवीन नळ जोडणी, मालमत्ता कर व विद्युत जोडणीसंबंधी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिरीसाठी ऑनलाइन नोंदणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार कार्ड, जन्म-मृत्यू नोंद, शिकाऊ वाहन चालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक व महिला शेतकरी प्रमाणपत्र तसेच सातबारा व आठ-अ नोंदी अद्ययावत करण्यासह जमिनीचे व्यवहार मोजणीशी जोडण्याची सुविधा देण्यात येणार आहे.

'सेवा माझे योगदान' उपक्रमातून युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सहभागाने स्वच्छता, रक्तदान, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, योग-ध्यान, महिलांचे आरोग्य, शिक्षण सहकार्य, डिजिटल साक्षरता, अवयवदान, व्यसनमुक्ती, रस्ता सुरक्षा, जलसंधारण, कचरा वर्गीकरण, सायबर सुरक्षा व शासकीय योजनांची जनजागृती करण्यात येणार आहे. 'विकसित भारत संकल्प यात्रा' व 'सेवा ज्योत यात्रा'च्या माध्यमातून विकास प्रकल्प व कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात येईल.

'अंगणवाडी उत्सव', 'आशीर्वादाचा दिवा', 'बदलाची गोष्ट' व 'नमो सेवागाथा' या उपक्रमांतून आरोग्य-पोषण योजनांची माहिती, लाभार्थ्यांच्या यशोगाथा आणि योजनांची जनजागृती करण्यात येणार आहे. 'जल, जन व सेवा संकल्प यात्रा' धुळे जिल्ह्यातून जाणार असून, स्थानिक योजना व विकासकामांबाबत संवाद कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा व विभागीय स्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

सेवा संकल्प अभियानाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर सोमवारी स्वच्छता मोहीम व श्रमदान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विभागीय पातळीवरील वेगळा उपक्रम म्हणून २ ते ४ ऑक्टोबर दरम्यान मंथन शिबीर आयोजित केले जाणार आहे. अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची व्यापक प्रसिद्धी होण्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी व उपसंचालक यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अभियानातील विविध उपक्रम, कार्यक्रम व योजनांशी संबंधित रील्स, छायाचित्रे व व्हिडिओ संबंधित विभागांनी व्हॉट्सॲपवर उपलब्ध करून द्यावेत,असे आवाहनही विभागीय आयुक्तांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत ३२ सदनिकांचे सोडत पद्धतीने वाटप

## महापौर समीर राजूरकर व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सोडत प्रक्रिया संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना राबविण्यात येत असून, या योजनेंतर्गत सफाई कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकांच्या वाटपासाठी आज महापौर श्री. समीर राजूरकर व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सोडत प्रक्रिया पार पडली.

महानगरपालिकेच्या सफाई कामगारांनी २५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ सेवा बजावलेली असल्यास तसेच सेवेत असताना किंवा सेवानिवृत्तीनंतर त्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसास मालकी तत्त्वावर मोफत सदनिका देण्याचा शासन निर्णय आहे. त्यानुसार महानगरपालिकेने ही योजना राबविली आहे.

या योजनेंतर्गत हर्सूल येथील गट क्रमांक २६६ मधील जागेवर दोन इमारतींमध्ये एकूण ३२ सदनिका बांधण्यात आल्या आहेत. प्रत्येक इमारतीमध्ये चार सदनिकांचे चार मजले असून, प्रत्येक सदनिका १ बीएचके स्वरूपाची आहे. सदनिकेचे बांधकाम क्षेत्रफळ साधारणतः ३० चौ.मी. आहे. या बांधकामासाठी



निविदेतील तरतुदीनुसार काम पूर्ण करण्यात आले असून, संबंधित कामाची प्रशासकीय व आर्थिक माहिती महापालिकेच्या नोंदीनुसार निश्चित करण्यात आली आहे.

सोडत कार्यक्रमास उपमहापौर श्री. राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती श्री. अनिल मकरिये, सभागृह नेते श्री. गोविंद केंद्रे, विरोधी पक्षनेते श्री. अब्दुल समीर साजिद, गलिच्छ वस्ती सुधार समिती सभापती श्री. जालिंदर शेंडगे, गटनेते श्री. हाजी शेरखान, नगरसेवक श्री. बालाजी मुंडे, श्री. फिरोज खान, मनपा आयुक्त श्री. अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त श्री. रणजीत पाटील, उपायुक्त श्रीमती अपर्णा थेटे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरांत आज ३१ अर्ज प्राप्त




छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वितरणासाठी आज आयोजित १५ विशेष मंडळस्तरीय शिबिरांमध्ये एकूण ३१ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती महसूल यंत्रणेने दिली आहे.

आज छत्रपती संभाजीनगर तालुक्यात ३, पैठण तालुक्यात २, फुलंब्री तालुक्यात १, वैजापूर तालुक्यात २, गंगापूर तालुक्यात २, कन्नड तालुक्यात १, खुलताबाद तालुक्यात १, सिल्लोड तालुक्यात २ आणि सोयगाव तालुक्यात १ अशा एकूण १५ शिबिरांचे आयोजन करण्यात आले. तालुकानिहाय प्राप्त अर्जांमध्ये छत्रपती संभाजीनगर तालुक्यात १, पैठण तालुक्यात ११, वैजापूर तालुक्यात ४, गंगापूर तालुक्यात ५ आणि खुलताबाद तालुक्यात १० असे एकूण ३१ अर्ज प्राप्त झाले. फुलंब्री, कन्नड, सिल्लोड व सोयगाव तालुक्यात आज अर्ज प्राप्त झाले नाहीत.

# मनपा नारेगाव शाळेतील १५० विद्यार्थ्यांची मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयास भेट

## पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेचया शाळांमधील विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास आणि संग्रहालयाची माहिती व्हावी, या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या संग्रहालय भेटीचे नियोजन करण्यात आले आहे.



या उपक्रमांतर्गत मनपा माध्यमिक शाळा, नारेगाव येथील मराठी व उर्दू माध्यमाच्या इयत्ता नववी व दहावीच्या सुमारे १५० विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयास भेट दिली. यावेळी पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अभ्यासासोबतच वाहन चालविताना पाळावयाचे नियम, मुलींची सुरक्षा आणि स्कूल बससंदर्भातील नियम याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत संग्रहालय भेटीच्या आयोजनाचे कौतुक केले.

या भेटीचे नियोजन उपायुक्त अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे यांनी केले. यावेळी मनपा प्राथमिक शाळा, नारेगावच्या मुख्याध्यापिका तिलोत्तमा मापारी, उर्दू शाळेचे मुख्याध्यापक जुबेर शेख यांच्यासह शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**
**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर.**
**जलसंपदा विभाग**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**
**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर**
E-mail: eemid labad@gmail.com दूरध्वनी क्र. ०२४०-२३३४१७९

**ई-निविदा सूचना क्र- ११ सन २०२६-२७ (ऑनलाईन)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https//mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१. छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव व किंमत :- | ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना भाग-१, टप्पा-२ वरील पंपगृहाच्या संरक्षण भिंतीचे कामे, पंपगृहाच्या तळाशी Concrete Bedding (with water proofing) पंपगृहाच्या मोकळ्या जागेत Paver Block, Solar Light चे काम, सुरक्षा दृष्टीने सी.सी.टी.व्ही. चे काम. (रु. ८५.२३ लक्ष) जी.एस.टी. सह |
| २. | इसारा/बायना रक्कम :- | या कामांची संबंधीत माहिती महाटेंडर या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचने (NIC) मध्ये देण्यात आलेली आहे. |
| ३. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | १२ महिने |
| ४. | निविदा संच किंमत :- | रु.२०००/- + GST १८% एकूण रु. २३६०/- |
| ५. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग :- | निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार |

१. ई निविदा उपलब्ध कालावधी दि. १६/०९/२०२६ ते दि. २३/०९/२०२६
२. ई निविदा उघडणे दिनांक: २५/०९/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे
३. खालील संकेतस्थळावर ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. https://mahatenders.gov.in
४. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सूचना फलक.
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)

जा.क्र/लपावि-१/लेखा-३/५८०९
लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय.
दिनांक :- ११/०९/२०२६

**स्वाक्षरीत/-**
**(उमेश वानखेडे)**
**कार्यकारी अभियंता**
**लघु पाटबंधारे विभाग क्र. १,**
**छत्रपती संभाजीनगर**

विमाका/छत्रपती संभाजीनगर/जाहि/१३०/२०२८